# जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भित्तीपत्रकाचे प्रकाशन



श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित केलेल्या भित्तीपत्रकाच्या प्रकाशन प्रसंगी प्रा.तब्बू कवठेकर समवेत शिवाजीराव पाटील,डॉ.विजयकुमार पाटील,डॉ.बी.एन.रावण,डॉ.एस.एस. कुरलीकर, डॉ.भरत पाटील,डॉ.भारती शिंदे व मान्यवर

जागतिक लोकसंख्या वाढीचा दर पाहता जागतिक पातळीवर सर्वांनीच लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे तरच आपण आपल्या देशाचा शाश्वत विकास करू शकतो असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित केलेल्या भित्तीपत्रकाच्या प्रकाशन प्रसंगी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता समीक्षा समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण, सहसमन्वयक डॉ.एस.एस.कुरलीकर, सायन्स विभागातील प्रा.तब्बू कवठेकर होते.

यावेळी भित्तीपत्रकाचे प्रकाशन रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.तब्बू कवठेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक व स्वागत डॉ.भारती शिंदे यांनी केले आभार डॉ. भरत पाटील यांनी मानले.

यावेळी सर्व शिक्षक प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.